आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२५ मे २०२४ - शनिवार

निवडणूक म्हणजे लोकशाहीतला मोठा उत्सव आणि भावी पिढ्यांच्या मनात लोकशाहीची मूल्यं रुजवण्याची एक संधी असल्याचं प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. डीडी न्यूजला दिलेल्या मुलाखतीत ते आज बोलत होते. सरकार किंवा राजकीय पक्षांनी त्यांच्या कामाचा हिशेब जनतेला द्यावा, असं मत त्यांनी व्यक्त केलं. निवडणूक म्हणजे लोकांना भेटण्याची एक प्रकारची संधी आहे असं मी मानतो. कोणत्याही प्रकारची टीका आपण गांभीर्यानं घेतो असंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यासाठी आज देशभरात मतदान सुरू आहे. सहा राज्यं आणि दोन केंद्रशासीत प्रदेशातल्या ५८ मतदारसंघासाठी हे मतदान होत आहे. उत्तरप्रदेशातल्या १४, हरियाणातल्या सर्व १०, पश्चिम बंगाल आणि बिहारमध्ये प्रत्येकी आठ, दिल्लीत सर्व ७, ओदिशामधल्या सहा, झारखंडमधल्या ४ आणि जम्मू काश्मीरमधल्या एका मतदारसंघासाठी आज मतदान होत आहे. सकाळी सात वाजता मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली असून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत ही प्रक्रिया सुरू राहील.

**दुपारी एक वाजेपर्यंत** अंदाजे ३९ टक्के मतदान पार पडलं आहे. यात पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक ५५ टक्के इतकं मतदान झालं आहे.

इतर राज्यातलं मतदान पुढीलप्रमाणे

झारखंड अंदाजे ४२ टक्के

उत्तर प्रदेशमध्ये ३७ टक्क्यापेक्षा जास्त
बिहार आणि हरियाणामध्ये प्रत्येकी ३६ टक्क्यापेक्षा जास्त
जम्मू काश्मिरमध्ये ३५ टक्क्यापेक्षा जास्त
दिल्लीमध्ये ३४ टक्क्यापेक्षा जास्त
ओदिशामध्ये अंदाजे ३६ टक्के इतकं मतदान झालं आहे.

**<><><><><>**

राज्यातील मतदान प्रक्रिया संपूर्णपणे शांततेत आणि सुरळीत झाल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं स्पष्ट केलं आहे. मतदान प्रक्रिया बाधित होत आहे असे दाखवणारे आणि ईव्हीएममध्ये छेडछाडीचा प्रयत्न होत असल्याचे दाखवणारे इतर राज्यांमधले काही जुने व्हिडिओ समाज माध्यमांद्वारे प्रसारित केले जात असल्याचं निदर्शनाला आलं असून हे व्हिडिओ राज्यातील लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ शी संबंधित नसल्याचं निवडणूक कार्यालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळानं मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल २७ मे, म्हणजे येत्या सोमवारी दुपारी एक वाजता ऑनलाइन जाहीर केला जाणार आहे. मंडळाच्या maha**h**sscboard.in या संकेतस्थळावर हा निकाल विद्यार्थ्यांना पाहता येणार आहे. गुणपडताळणीसाठी आणि गुणपत्रिकेच्या छायाप्रतींसाठी २८ मे

२०२४ ते ११ जून २०२४ या काळात मंडळाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीनं अर्ज सादर करता येणार आहेत.

**<><><><><>**

दक्षिण कोरियामध्ये झालेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत भारतीय महिला संघानं सुवर्ण पदक जिंकलं आहे. ज्योती सुरेखा वेन्नम, परनीत कौर आणि आदिती स्वामी यांच्या संघानं तुर्कीएच्या संघाला अंतिम सामन्यात पराभूत केलं. दरम्यान, ज्योती आणि प्रियांश यांना मिश्र दुहेरीत अमेरिकेच्या ऑलिव्हिया डीन आणि सॉयर सुलियन यांच्याकडून पराभव पत्करावा लागल्यामुळे रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं.

**<><><><><>**

पुण्यातल्या कल्याणी नगर कार अपघातप्रकरणी अल्पवयीन आरोपीचे वडील विशाल अगरवाल याच्यासह अन्य पाच जणांना ७ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. या सर्वांची पोलीस कोठडी काल संपली होती. या प्रकरणातील अल्पवयीन आरोपी बालसुधारगृहात आहे. दरम्यान, या प्रकरणात नियमांचं उल्लंघन केल्यामुळे दोन पोलिसांना निलंबित करण्यात आलं आहे. गेल्या रविवारी हा अपघात घडला होता.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये काल संध्याकाळी चेन्नई इथं झालेल्या दुसऱ्या प्ले ऑफ सामन्यात सनरायझर्स हैदराबादनं राजस्थान रॉयल्स संघाचा ३६ धावांनी पराभव केला. अंतिम सामना उद्या सनरायझर्स हैदराबाद आणि

कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात होणार आहे. हा सामना चेन्नईच्या एम ए चिदंबरम स्टेडियमवर होणार आहे.

<><><><>

राहुरी इथलं महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि सोसायटी ऑफ ऑटोमोटीव्ह इंजिनियर्स, इंडिया यांच्या संयुक्त विद्यमानं राष्ट्रीय पातळीवरच्या तंत्रज्ञान तिफण-२०२४ या स्पर्धेचं उद्घाटन आज भोपाळ इथल्या केंद्रीय कृषी अभियांत्रिकी संस्थेचे संचालक डॉ. सी.आर. मेहता यांच्या हस्ते झालं. या स्पर्धेत देशभरातल्या अभियांत्रिकी महाविद्यालयांतले ७३ संघ सहभागी झाले आहेत. ट्रॅक्टरचलीत भाजीपाला पूर्नलागवड यंत्रं असा स्पर्धेचा विषय असून ही स्पर्धा आज आणि उद्या अशी दोन दिवस चालणार आहे.

<><><><>

बीड जिल्ह्यात अंबाजोगाई इथं तृतीयपंथीयांना रोजगाराचं मोफत प्रशिक्षण दिल्याचं दीनदयाल शोध संस्थानचे संचालक गंगाधर देशमुख यांनी सांगितलं आहे.

<><><><>

विको कंपनीचे अध्यक्ष यशवंतराव पेंढारकर यांचं काल नागपूरमध्ये निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. २०१६ पासून त्यांनी विको कंपनीच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती. त्यांच्या नेतृत्वात कंपनीनं कालसुसंगत बदल स्वीकारत प्रगतीचे नवनवे टप्पे गाठले. त्यांच्याच कार्यकाळात

कंपनीला इकॉनॉमिक टाइम्सचा २०२३ या वर्षाचा 'ब्रँड आँफ द इअर' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला होता. पेंढारकर यांच्या पार्थिवावर नागपूरच्या अंबाझरी घाट इथं आज सकाळी अंत्यसंस्कार झाले.

//<><><><><>//